# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
e-mail : **desk4@dte.org.in** Web : **http://www.dte.org.in**

कार्यालयीन आदेश

क्र. 4(3)/आस्था/कं.नि./2008/1432
दिनांक : 31 जुलाई JUL 2008

पहा : 1) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. एससीटी 6506/(06/07)/तांशि 4, दिनांक 24 एप्रिल, 2007
2) शासन शुध्दीपत्रक उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. एससीटी 6507/(06/07)/तांशि 4, दिनांक 10.09.2007
3) कार्यालयीन आदेश क्र. 4(3)/आस्था/कं.नि./2007/31443, दि. 19.12.2007

श्री. वनगुजरे प्रशांत रमेशराव यांची संदर्भ क्र. 3 च्या आदेशान्वये कंत्राटी तत्वावर केलेली नियुक्ती रद्द करुन संदर्भ क्र. 1 व 2 च्या शासन निर्णयान्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे त्यांची पुढील तक्त्यात नमूद केलेल्या ठिकाणी कंत्राटी तत्वावर नियुक्ती रु. 12,000/- (रुपये बारा हजार फक्त) या मासिक ठोक वेतनावर या आदेशाच्या दिनांकापासून दोन वर्ष किंवा श्री. आय. के. पटेरीया हे प्रतिनियुक्तीवरुन हजर होईपर्यंत किंवा महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत अथवा नियमित स्वरुपात नियुक्तीने उमदेवार उपलब्ध होणे यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत निव्वळ कंत्राटी तत्वावर नियुक्ती करीत आहेत.

| अ. क्र. | उमेदवारांचे नाव व पत्ता | नियुक्ती प्रवर्ग | कंत्राटी तत्वावर नियुक्तीचे पद व ठिकाण |
|---|---|---|---|
| 1. | **श्री. वनगुजरे प्रशांत रमेशराव, (०१००२४४०)**<br>**मु.पो. रांजनी, ता. घनसंवगी [GHANSAVANGI ]**<br>**जि.जालना, पिन. ४३१ ६०५** | इमाव | शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद श्री. आय. के. पटेरीया यांच्या प्रतिनियुक्तीमुळे रिक्त असलेल्या अधिव्याख्याता स्थापत्य अभियांत्रिकी या पदावर |

वरील उमेदवारांच्या कंत्राटी तत्वावरील नियुक्त्या पुढील अटी व शर्तींच्या अधिन राहून करण्यात येत आहेत.

1. **श्री. वनगुजरे यांची नियुक्त्यी या आदेशाच्या दिनांकापासून दोन वर्ष किंवा महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत अथवा नियमित स्वरुपात नियुक्तीने उमदेवार उपलब्ध होणे यापैकी जे अगोदर घडेल तेवढया कालावधीसाठी असतील, त्यानंतर या कंत्राटी नियुक्त्या आपोआप संपुष्ठात येतील.**
2. श्री. वनगुजरे यांची नियुक्त्यी रु. 12,000/- (रुपये बारा हजार फक्त) या एकत्रित मासिक वेतनावर करण्यात येत असून त्यांना कोणत्याही प्रकारचे इतर भत्ते अनुज्ञेय राहणार नाहीत.
3. श्री. वनगुजरे यांनी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद येथे उपलब्ध असलेल्या करार पत्राच्या नमुन्यात रु. 100/- च्या स्टँम्प पेपरवर करारपत्र नियुक्त पदावर हजर होतेवेळी देणे बंधनकारक आहे. अन्यथा सदरचे आदेश रद्द ठरतील.

4. श्री. वनगुजरे यांची सेवा बदलीपात्र राहणार नाहीत, मात्र प्रशासकीय कारणास्तव व विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कार्यासाठी गरज उद्भवल्यास त्यांची इतर शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात बदली करण्यात येईल.

५. श्री. वनगुजरे यांची नियुक्ती त्यांचे शैक्षणिक / अध्यापनाचे काम समाधानकारण असण्यावर अवलंबून राहीत व कोणत्याही पुर्वसूचनेशिवाय संपुष्ठात आणण्यात येतील व याबाबतीत संबंधित विभाग प्रमुख / प्राचार्य यांची शिफारस अंतिम राहील.

६. श्री. वनगुजरे यांचे विरुध्द विद्यार्थ्यांची तक्रार असल्यास सदर तक्रारीबाबत संबंधित विभाग प्रमुख / प्राचार्यांच्या शिफारशीनुसार त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

७. **श्री. वनगुजरे यांनी या आदेशाच्या दिनांकापासून 8 दिवसांच्या आत रुजू व्हावे, जे उमेदवार दिलेल्या मुदतीत रुजू होणार नाहीत त्यांच्या नियुक्तीचा आदेश आपोआप संपुष्ठात येईल, त्याबाबत पुनर्विचार करण्यांत येणार नाही याची नोंद घ्यावी.**

८. श्री. वनगुजरे यांची नियुक्त्यी करारपत्रात नमूद केलेल्या कालावधीनंतर आपोआप संपुष्ठात येतील.

९. प्रस्तुत नियुक्ती ही निव्वळ कंत्राटी पध्दतीने असल्यामुळे संबंधितांना नियमित नियुक्ती धारकांचे लाभ मिळणार नाहीत.

१०. श्री. वनगुजरे यांनी अध्यापनाशिवाय वरीष्ठांनी सोपविलेली तद्नुषंगीक इतर प्रशासकीय कामे करणे बंधनकारक राहील.

११. **श्री. वनगुजरे यांनी त्यांच्या शैक्षणिक अर्हतेच्या प्रमाणपत्राचा छायांकीत 1 संच मुळ प्रमाणपत्रासह नियुक्तीच्या पदावर हजर होतेवेळी प्राचार्यांना सादर करावा. त्यांनी ऑन लाईन पध्दतीने अर्ज करतांना दिलेली माहिती व प्रत्यक्ष प्रमाणपत्रांची माहिती यामध्ये तफावत आढळल्यास संबंधितांचे नियुक्ती आदेश आपोआप संपुष्ठात येतील, याची नोंद घेण्यात यावी.**

१२. श्री. वनगुजरे यांनी त्यांचेवर कोणत्याही प्रकारचा गुन्हा नसल्याचे किंवा कोणतयाही प्रकारचे आरोप नसल्याचे प्रतिज्ञापत्र स्वतंत्रपणे संबंधितांनी सादर करणे अनिवार्य आहे.

१३. ज्या प्रकरणी वरील कार्यपध्दतीचे पालन करण्यात येणार नाही, त्या प्रकरणी संबधितांवर जबाबदारी निश्चित करुन कारवाई करण्यांत येईल.

(डॉ. सु. का. महाजन)
**प्र. संचालक**
**तंत्र शिक्षण, म.रा., मुंबई**

प्रत:
मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०००३२ यांना माहितीसाठी सादर

**प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित :**

१. कोषागार अधिकारी, औरंगाबाद (मानार्थ) (प्राचार्यांमार्फत)
२. प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद
३. सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, औरंगाबाद
४. संबंधित व्यक्ती (५) कार्यासन क्रमांक ४, निवड नस्तीस.